# मुंबई विद्यापीठ

( नॅक पुनर्मूल्यांकनाव्दारे ३.६५ (सी.जी.पी.ए.) सह अ++ श्रेणी
विद्यापीठ अनुदान आयोगाव्दारे श्रेणी १ विद्यापीठ दर्जा )

महात्मा गांधी रोड, फोर्ट, मुंबई - ४०० ०३२

वेब साईट : www.mu.ac.in ई-मेल :hrdc.recruitment@mu.ac.in दूरध्वनी : ०२२-६८३२००९३/९४

**जाहिरात क्र.: मुंवि/मासंविक/०७/२०२४, दि. ०४ सप्टेंबर, २०२४**

संदर्भ : शासन निर्णय क्र. संकीर्ण-२०२४/प्र.क्र.९०/व्यशि-३, दि. ०९ जुलै, २०२४

महाराष्ट्र शासनाच्या **'मुख्यमंत्री युवा कार्य प्रशिक्षण योजने'** अंतर्गत इच्छुक युवकांना कार्य प्रशिक्षणाची (Apprentice) संधी उपलब्ध करुन देण्याच्या अनुषंगाने मुंबई विद्यापीठाच्या विविध विभागात खालील प्रशिक्षणार्थी उमेदवारांची नियुक्ती करावयाची आहे.

**सदर योजनेकरीता उमेदवाराची पात्रता खालील प्रमाणे असेल :**

१) उमेदवाराचे वय किमान १८ व कमाल ३५ वर्षे असावे.
२) उमेदवाराची किमान शैक्षणिक पात्रता १२ वी पास / आयटीआय / पदवीधर / पदव्युत्तर किंवा डिप्लोमा धारक असावी.
३) उमेदवार हा महाराष्ट्राचा रहिवासी असावा.
४) उमेदवाराची आधार नोंदणी असावी.
५) उमेदवाराचे बँक खाते आधार संलग्न असावे.
६) उमेदवाराने कौशल्य, रोजगार, उद्योजकता आणि नाविन्यता विभागाच्या वेबसाईटवर नोंदणी केली पाहीजे.

या कार्य प्रशिक्षण योजनेंतर्गत प्रशिक्षणार्थींना त्यांच्या शैक्षणिक अर्हतेप्रमाणे उपरोक्त संदर्भीय शासन निर्णयाप्रमाणे विद्यावेतन महाराष्ट्र शासनामार्फत DBT प्रणालीव्दारे दिले जाईल. (अधिक माहितीसाठी शासन निर्णयाचे अवलोकन करावे) सदर विद्यावेतनाचे विवरण खालीलप्रमाणे असेल.

| **अ.क्र.** | **शैक्षणिक अर्हता** | **प्रतिमाह विद्यावेतन** |
|---|---|---|
| १ | १२ वी पास | रु. ६०००/- |
| २ | आय.टी.आय./पदविका | रु. ८,०००/- |
| ३ | पदवीधर/पदव्युत्तर | रु. १०,०००/- |

**मुंबई विद्यापीठात नियुक्त करावयाचे प्रशिक्षणार्थी विवरण व पदसंख्या पुढीलप्रमाणे :**

| अ.क्र. | तपशील | फोर्ट परीसर | कलिना परिसर | ठाणे परिसर | एकुण पदसंख्या |
|---|---|---|---|---|---|
| १ | प्रशिक्षणार्थी - वित्त व लेखा सहायक | १० | ९ | १ | **२०** |
| २ | प्रशिक्षणार्थी - कनिष्ठ लघुलेखक | ४ | २ | - | **०६** |
| ३ | प्रशिक्षणार्थी - विधी सहायक | २ | - | - | **०२** |
| ४ | प्रशिक्षणार्थी - प्रयोगशाळा सहायक | - | ४ | - | **०४** |
| ५ | प्रशिक्षणार्थी - वीजतंत्री (Electrician) | १ | २ | - | **०३** |
| ६ | प्रशिक्षणार्थी - वातानुकुलीत यंत्र तंत्रज्ञ | १ | १ | - | **०२** |
| ७ | प्रशिक्षणार्थी - सुतार | १ | ४ | - | **०५** |
| ८ | प्रशिक्षणार्थी – प्लंबर (नळकारागीर) | १ | २ | - | **०३** |
| ९ | प्रशिक्षणार्थी – गवंडी (मेसन) | १ | ६ | - | **०७** |
| १० | प्रशिक्षणार्थी - ग्रंथालय सहायक | १ | ४ | १ | **०६** |
| ११ | प्रशिक्षणार्थी – परिचारीका/परिचर | - | २ | - | **०२** |
| १२ | प्रशिक्षणार्थी – काच फुगारी | - | १ | - | **०१** |
| १३ | प्रशिक्षणार्थी – वेल्डर (जोडणीकार) | - | १ | - | **०१** |
| १४ | प्रशिक्षणार्थी – प्रयोगशाळा वीजतंत्री (Electrician for Laboratories) | - | ४ | - | **०४** |
| १५ | प्रशिक्षणार्थी - Multi Task Operator | ६ | १४ | - | **२०** |
| | **एकुण** | | | | **८६** |

**उपरोक्त पदांसाठी आवश्यक शैक्षणिक अर्हता पुढीलप्रमाणे :**

| अ.क्र. | पदनाम | शैक्षणिक अर्हता |
|---|---|---|
| १ | प्रशिक्षणार्थी - वित्त व लेखा सहायक | १) वाणिज्य शाखेची पदवी/पदव्युत्तर पदवी.<br>२) Tally (प्रमाणपत्र धारक प्राधान्य)<br>३) टंकलेखन इंग्रजी व मराठी<br>४) MS-CIT परिक्षा उत्तीर्ण असणे आवश्यक. |
| २ | प्रशिक्षणार्थी - कनिष्ठ लघुलेखक | १) मान्यताप्राप्त विद्यापीठाची पदवी<br>२) लघुलेखन (इंग्रजी व मराठी ) शासकीय वाणिज्य प्रमाणपत्र परीक्षा उत्तीर्ण असणे आवश्यक.<br>३) टंकलेखन इंग्रजी व मराठी<br>४) MS-CIT परिक्षा उत्तीर्ण असणे आवश्यक. |
| ३ | प्रशिक्षणार्थी - विधी सहायक | १) विधी शाखेची पदवी अथवा पदव्युत्तर.<br>२) टंकलेखन इंग्रजी व मराठी<br>३) MS-CIT परिक्षा उत्तीर्ण असणे आवश्यक. |

..३..

| अ.क्र. | पदनाम | शैक्षणिक अर्हता |
|---|---|---|
| ४ | प्रशिक्षणार्थी - प्रयोगशाळा सहायक | १) विज्ञान शाखेची पदवी/पदव्युत्तर (B.Sc./M.Sc.).<br>२) MS-CIT परिक्षा उत्तीर्ण असणे आवश्यक. |
| ५ | प्रशिक्षणार्थी - वीजतंत्री (Electrician) | १) ITI/Diploma/Degree - Electrical |
| ६ | प्रशिक्षणार्थी - वातानुकुलीत यंत्र तंत्रज्ञ | १) ITI (Refrigeration and Air Conditioning) or Diploma/Degree – Electrical |
| ७ | प्रशिक्षणार्थी – सुतार | १) ITI (Carpentry and Wood Training)/Diploma |
| ८ | प्रशिक्षणार्थी – प्लंबर (नळकारागीर) | १) ITI (Plumbing)/Diploma |
| ९ | प्रशिक्षणार्थी – गवंडी (Mason) | २) ITI (गवंडीकाम/बांधकाम) |
| १० | प्रशिक्षणार्थी – ग्रंथालय सहायक | १) ग्रंथालय शास्त्र पदवी/पदव्युत्तर पदवी (B.Lib./M.Lib.)<br>२) MS-CIT परिक्षा उत्तीर्ण असणे आवश्यक. |
| ११ | प्रशिक्षणार्थी – परिचारीका/परिचर | १) Diploma/Degree - Nursing |
| १२ | प्रशिक्षणार्थी – काच फुगारी | १) ITI/Diploma/Degree – Glass Blowing |
| १३ | प्रशिक्षणार्थी – वेल्डर (जोडणीकार) | १) ITI/Diploma/Degree – Welding |
| १४ | प्रशिक्षणार्थी – प्रयोगशाळा वीजतंत्री (Electrician for Laboratories) | १) ITI/Diploma/Degree - Electrical |
| १५ | प्रशिक्षणार्थी – Multi Task Operator | १) कोणत्याही शाखेची पदवी/पदव्युत्तर पदवी.<br>२) टंकलेखन इंग्रजी व मराठी<br>३) MS-CIT परिक्षा उत्तीर्ण असणे आवश्यक. |

**प्रशिक्षणार्थी उमेदवारांकरीता सूचना**

१) विद्यापीठाच्या उपरोक्त नमुद पदांकरीता इच्छुक उमेदवारांनी कार्य प्रशिक्षणाकरीता (Apprentice) शासनाच्या कौशल्य, रोजगार, उद्योजकता आणि नाविन्यता विभागाच्या www.rojgar.mahaswayam.gov.in या वेबसाईटवर नोंदणी करणे आवश्यक आहे.

२) नोंदणीची प्रक्रिया व कार्य प्रशिक्षणाकरीता अर्ज सादर करण्याची प्रक्रिया उपरोक्त वेबसाईटवर उपलब्ध आहे.

३) विद्यापीठातील वर नमुद पदांवर प्रशिक्षणार्थी म्हणून काम करु इच्छीणाऱ्या उमेदवारांकरीता अर्ज सादर करण्याची मुदत दिनांक **२४/०९/२०२४** पर्यंत आहे.

४) सदर कार्य प्रशिक्षणाचा कालावधी ६ महिने असेल, सदरच्या सहा महिन्याच्या कालावधीसाठी उमेदवारांना या योजनेअंतर्गत शासनामार्फत विद्यावेतन देण्यात येईल.

५) प्रशिक्षण पूर्ण केलेल्या उमेदवारांना विद्यापीठाकडुन प्रशिक्षण यशस्वीरित्या पूर्ण केल्याचे प्रमाणपत्र देण्यात यईल.

६) या योजनेअंतर्गत प्रशिक्षण घेत असलेल्या उमेदवारांना किमान वेतन कायदा, राज्य कामगार विमा कायदा, कामगार भविष्य निर्वाह निधी कायदा, कामगार नुकसान भरपाई कायदा व औद्योगिक विवाद कायदा लागू राहणार नाही.

७) या योजनेंतर्गत प्रशिक्षणा दरम्यान प्रशिक्षणार्थींची दैनिक हजेरी ऑनलाईन पध्दतीने घेण्यात येईल. सदर ऑनलाईन उपस्थितीच्या आधारे प्रशिक्षणार्थीचे विद्यावेतन प्रशिक्षणार्थीच्या थेट बँक खात्यात (DBT) ऑनलाईन पध्दतीने दरमहा अदा करण्यात येईल.

८) या योजनेअंतर्गत प्रशिक्षणार्थी महिन्यातून १० दिवस अथवा त्यापेक्षा जास्त दिवस गैरहजर असला तर, संबंधित प्रशिक्षणार्थीस त्या महिन्याचे विद्यावेतन अनुज्ञेय राहणार नाही.

९) प्रशिक्षणार्थीने वरील अटींची पूर्तता केली असली परंतु सदर प्रशिक्षणार्थी प्रशिक्षणाच्या पहिल्याच महिन्यात प्रशिक्षण सोडून गेल्यास असा प्रशिक्षणार्थी विद्यावेतनास पात्र राहणार नाही.

१०) या योजनेच्या दरम्यान प्रशिक्षार्थीस कायम /नियमित स्वरुपाचा रोजगार अथवा स्वयंरोजगार प्राप्त झाल्यास अथवा प्रशिक्षण सोडून गेल्यास अथवा अनधिकृत गैरहजर राहिल्यास या योजनेअंतर्गत प्रशिक्षण व त्या अनुषंगाने विद्यावेतन घेण्यासाठी पात्र राहणार नाही.

११) या योजनेअंतर्गत शिकाऊ उमेदवारी (NAPS/MAPS) पूर्ण केलेले व करीत असलेले उमेदवार पात्र राहणार नाहीत.

१२) एका उमेदवारास या योजनेचा लाभ एकदाच घेता येईल.

**कुलसचिव**
**मुंबई विद्यापीठ**